महाराष्ट्र शासन
सहाय्यक संचालक,स्थानिक निधी लेखा परिक्षा, रायगड
यांचे कार्यालय,विष्णू सिध्दराज इमारत, दुसरा मजला अलिबाग.

कार्यालय दुरध्वनी क्र.०२१४१-२९५१०९ ई-मेल- ad.raigad@mahalfa.in

क्र.स्था.१८/ब/कंत्राटी वाहन चालक दरपत्रक/रायगड/२५८ दिनांक :- ११/०५/२०२१

प्रति,

------------------------
------------------------
------------------------

विषय - कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पदाची कामे करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता दरपत्रके पाठविणेबाबत.

संदर्भ- संचालनालयाचे पत्र क्र.स्था.१८/ब/आस्था-७/न.क्र.६०/कंत्राटी वाहन बाहय यंत्रणा-शिपाई/६६० दिनांक १९/०४/२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रान्वये सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा, रायगड-अलिबाग या कार्यालयातील वाहनाकरीता ०१/०९/२०२१ पासून ११ महिन्यासाठी बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्था/बरोजगार संस्थांकडून मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

तरी संबंधितांनी आपले दरपत्रक विहीत अटी व शर्तीचे अधिन राहून सोबत जोडलेल्या दरपत्रक प्रपत्रात भरून बंद लिफाफयात दिनांक २०/०५/२०२१ पर्यंत सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्वत: सादर करावीत किंवा सदर वेळेत कार्यायात मिळतील या प्रकारे पोस्ट /कुरीयर सेवेद्वारे पाठवावे. दरपत्रकाच्या अटी व शर्ती या संचालनालयाचे website (www.mahalfa.in) वर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर दिनांकानंतर प्राप्त होणारी दरपत्रके दर प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाहीत. नमूद करावयाचे दर हे सर्व करांसहित नमूद करावेत.

(सदाशिव पाटील)
सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखा परिक्षा
रायगड-अलिबाग

**सहपत्रः- दपत्रक नमुना व सर्वसाधारण अटी व शर्ती.**

**प्रतः-**

१) मा.सह संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, कोकण विभाग, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) सहाय्यक संचालक, (संगणक), स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
३) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग. यांचे नोटिस बोर्ड.
४) कार्यालयाचे नोटीस बोर्ड.

## वाहन चालक पदाची कामे करण्यासाठी मुनष्यबळ पुरविणेसाठी निविदा / दरपत्रक

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, रायगड-अलिबाग कार्यालय यांना कंत्राटी पध्दतीने Mahindra Bolero या वाहनासाठी वाहन चालक पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्था/बेरोजगार संस्थाकडून दिनांक ०१/०९/२०२१ ते दिनांक ३१/०७/२०२२ या कालावधीकरीता मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता निविदा / दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

### निविदा / दरपत्रकाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती:- (General Terms and Conditions)

**(१) पक्षकार:** करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे.) आणि सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय जिल्हा रायगड हे राहतील.

**(२) पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाची शैक्षणिक पात्रता व इतर तपशील खालील प्रमाणे असेल.**

१) वाहन चालक किमान ४ इयत्ता उत्तीर्ण असावा. त्याला मराठी/हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

२) नुतनीकरण अदयावत असलेला जीप, कार व अवजड वाहन चालवण्याचा मोटार वाहन कायद्यांतर्गत आवश्यक असलेला वाहन चालविण्याचा परवाना वाहन चालकाकडे असणे आवश्यक आहे.

३) वाहन चालकाचे ओळखपत्र, आधारकार्ड, निवडणूक कार्ड, पॅनकार्ड इत्यादी पैकी एक त्याच्याजवळ असावे.

४) वाहन चालकाला वाहन चालविण्याचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५) वाहन चालकाचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त व १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

६) वाहन चालकाच्या चारीत्र्याची तपासणी राजपत्रित अधिकाऱ्याकडून करून घ्यावी. कंत्राटदार संस्थेने वाहन चालकाचे पोलीस पडताळणीसह ओळखपत्र दयावे.

७) वाहन चालकास वाहन दुरूस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

८) वाहन चालक शारीरिक दृष्टया सक्षम असावा. त्याची वागणूक विनम्रतेची आणि सहकार्याची असावी.

९) वाहन चालकाची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी व अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ.

**(३) कंत्राटी वाहन चालकाची जबाबदारी :**

१) प्रतिदिन ९ तास काम करणे आवश्यक आहे.

२) सहाय्यक संचालक हे ज्यावेळी कामावर बोलवतील त्या वेळेस तत्परतेने कामावर यावे लागेल.

३) आवश्यकता भासल्यास सुट्टीच्या दिवशीही कामावर बोलावण्याचा अधिकार सहाय्यक संचालक यांना असेल. सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून वेगळे पारिश्रमीक वा भत्ते मागता येणार नाहीत.

४) वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहन चालकाची जबाबदारी असेल.

५) कंत्राटी वाहन चालकाचे कार्यक्षेत्र हे संबंधित जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र असेल, शासकिय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास जिल्हयाबाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल.

**(४) वाहन चालकाला अनुज्ञेय असणारे पारिश्रमीक , भत्ते व त्यांचे प्रदान:**

१) कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या कामगारास अदा करावयाच्या पारिश्रमिकाची रक्कम ही किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + राज्य कामगार विमा योजना + कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम इत्यादी मिळून होणारी रक्कम यापेक्षा कमी असणार नाही. कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या प्रशासकिय सेवेचा (Administrative Service Charges ) स्वतंत्रपणे दर्शवावे.

२) अतिकालीक कालावधीकरीता तसेच दौरा कालावधीकरीता नियमित शासकिय वाहन चालकास अनुज्ञेय असलेले अतिकालीक भत्ता व प्रवास भत्त्याच्या दराप्रमाणे भत्ते अनुज्ञेय राहतील. परंतू त्याची मागणी कंत्राटदाराने / पुरवठादाराने स्वतंत्रपणे करावी.

३) अतिकालीक भत्ता हा दिवसाच्या ९ तासाचे काम संपल्यावर १ तास झाल्यानंतर म्हणजेच १० तासानंतर लागू राहील.

४) महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयात कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयक सादर करावे. देयक पारीत झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.

५) वाहन चालकाचे मासिक पारीश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित वाहन चालकाच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque) / NEFT / ECS द्वारे जमा करणे आवश्यक राहील.

६) कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहन चालकाला दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या धनादेशाची छायांकित प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

७) कंत्राटदाराने / पुरवठा दाराने कंत्राटी वाहन चालकांना किमान वेतन कायदयातील तरतुदीपेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल.

८) कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करतांना आयकर कायदयातील तरतुदीनूसार आयकराची रक्कम कपात करून उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

९) ई.एस.आय.सी., पी.पी.एफ., व्यवसायकर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांचे राहील.

**(५) नुकसानीबाबत कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे दायित्व :**

१) कंत्राटदाराने / पुरवठादाराने नेमलेल्या कंत्राटी वाहन चालकास दैनंदिन काम करतांना काही इजा व हानी झाल्यास संबंधित नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार / पुरवठादार याला अदा करावा लागेल. सदर वाहन

चालकाच्या सेवेचे तसेच त्यास झालेल्या इजा वा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही. त्याची संपर्ण जबाबदारी कंत्राटदार / पुरवठादार यांची असेल.

२) कंत्राटी वाहन चालकास नियमित शासकिय कर्मचाऱ्यांचे नियम / अटी व शर्ती लागू असणार नाहीत. नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना कोणतेही वेतन, भत्ते व अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत व त्यांच्या सेवेचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही.

३) कंत्राटी वाहन चालकाकडून होणाऱ्या शासकिय मालमत्तेच्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांच्यावर राहील.

४) कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास किंवा विहित वेळेत वाहन चालक उपलब्ध करून न दिल्यामुळे अन्य मार्गाने वाहन चालक उपलब्ध करून घेतल्यामुळे त्यास काही पारिश्रमिक द्यावे लागल्यास ती सर्व रक्कम कंत्राटदाराच्या / पुरवठादाराच्या प्रलंबित देयकातून अथवा सुरक्षा ठेवीतून कपात करण्यात येईल.

५) कंत्राटी वाहन चालकाच्या अनुपस्थितीच्या दिवशी कंत्राटदाराने / पुरवठादाराने पर्यायी व्यवस्था करून दिली पाहिजे.

**(६) दरपत्रके सादर करण्याच्या अटी व शर्ती :**

१) दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने सादर कराव्या लागतील. तांत्रिक लिफाफा व दराचा लिफाफा.

**(I) तांत्रिक लिफाफा**

तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे आवश्यक असतील:

अ) दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत किंवा सहकारी संस्था नोंदणी झालेले प्रमाणपत्र अथवा शासनाच्या कोणत्याही विभागाकडे नोंदणी केलेले नोंदणी प्रमाणपत्र.

ब) दरपत्रके सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत आयकर भरल्यासंबंधितचे आयकर प्रमाणपत्र व आयकर विभागाकडे नोंदणी केलेले पॅन कार्ड, GST नोंदणी प्रमाणपत्र.

क) कामगार कायदयातील तरतूदीनुसार आवश्यक असल्यास कामगार कायदयांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.

ड) व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र.

इ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्यातील तरतूदीनुसार नोंदणी आवश्यक असल्यास कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र.

ई) अनामत रक्कमेचा धनाकर्ष- निविदा / दरपत्रासोबत अनामत ठेव म्हणून रूपये ५०००/- चा धनाकर्ष (जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीकृत बँकेचा) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, जिल्हा रायगड यांचे नावे देण्यात यावा.

**(II) दराचा लिफाफा.**

सदरच्या लिफाफयामध्ये सोबत जोडल्याप्रमाणे दरपत्रक सादर करण्यात यावे.

२) कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध / विधीग्राहय असणे.

३) दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्रकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील.

४) तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान तीन वैदय दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटादाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील.

५) प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.

६) पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापुर्वी रूपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करून देणे आवश्यक राहील.

७) निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास तात्काळ सुरक्षा ठेव (Performance Security) रूपये १०,०००/- चा धनाकर्ष (जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा ) सहाय्यक संचालक, स्थानिकनिधी लेखापरिक्षा, रायगड यांचे नावे दयावा लागेल. करारनाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करानामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल.

८) कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त केली जाईल.

९) कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यासाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतेही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

१०) सहाय्यक संचालक, यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदा धारकास एक महिन्याची आगाऊ नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

# निविदा / दरपत्रक प्रपत्र

पुरवठादाराचे नाव:-

| अ.क्र. | बाब | कुशल कामगारासाठी दर (प्रतिमाह) रुपया मध्ये |
|---|---|---|
| १ | मुळ वेतन (Basic Pay) | |
| २ | विशेष भत्ता (Special Allowance) | |
| ३ | कामगार कायद्यातील तरतूदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम. जसे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजना, निवृत्ती वेतन निधी, कर्मचारी कल्याण निधी, व्यवसायकर इत्यादी. | |
| ४ | कंत्राटदार / पुरवठादाराचे प्रशासनिक सेवा खर्च (Firms Administrative Service Charges) | |
| ५ | वस्तू व सेवाकर (GST) | |
| | एकूण | |

(अक्षरी रक्कम रूपये ------------------------------------------------------------ मात्र)

ठिकाण:-

दिनांक:-

स्वाक्षरी व शिक्का

वरील पैकी बाब क्रमांक ०१ व ०२ चे संदर्भात राज्य शासनाने कुशल कामगारासाठी निश्चित केलेल्या अद्यावत अस्तित्वात असलेल्या दरांची प्रत जोडणे आवश्यक राहील. अ.क्र. ३ चे बाबतीत संबंधीत कायद्यात तरतूदीनुसार दिलेले दराचे आदेश जोडणे आवश्यक आहे.